लोकमत

# मुद्देमाल परत...



वसमत शहर पोलिस ठाणे अंतर्गत एका गुन्ह्यातील आरोपीकडून हस्तगत केलेला मुद्देमाल फिर्यादीस परत करताना पोलिस निरीक्षक कुंदनकुमार वाघमारे.

Hello Hingoli
Page No. 3 Dec 01, 2024
Powered by: erelego.com

पुण्य नगरी

# चोरीतील २० लाख ६८ हजारांचा हस्तगत मुद्देमाल मुळ मालकांना परत

**हिंगोली / प्रतिनिधी**

पोलीस अधीक्षक यांच्या संकल्पनेतून जिल्हा घटकातील गुन्ह्यातील आरोपीकडून हस्तगत केलेला २० लाख ६८ हजार रुपयांचा मुद्देमाल फिर्यादीस अर्थात मूळ मालकास सन्मानपूर्वक परत करण्यात आला.

पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या संकल्पनेतून जिल्हा घटकातील जास्तीत जास्त मुद्देमाल फिर्यादीस परत करण्याबाबत जिल्हा घटकातील सर्व पोलीस ठाणे स्तरावर मोहीम राबविण्याबाबत सर्व प्रभारी अधिकारी यांना सूचना देण्यात आल्या होत्या. त्याअनुषंगाने शनिवारी (दि.३०) जिल्हा घटकातील पोलीस ठाणे स्तरावर गुन्ह्यात आरोपीकडून हस्तगत करण्यात आलेला मुद्देमाल फिर्यादीस परत करण्याबाबत मोहीम राबविण्यात आली आहे. सदर मोहीमेदरम्यान, जिल्ह्यात एकूण ४



गुन्ह्यातील सोन्या-चांदीचे दागिने व नगदी असे किमती २ लाख ६८ हजार रुपये तर १४ वाहने किंमत १८ लाख रूपये असा एकूण २० लाख ६८ हजार रुपयांचा मुद्देमाल शनिवारी (दि.३०) फिर्यादीस परत करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी हिंगोली जिल्ह्याचा चार्ज घेतल्यापासून आता पावेतो अशाच प्रकारची मोहीम राबवून एकुण जप्त करण्यात आलेला ५२ लाख ५४ हजार ५०० रूपयांचा मुद्देमाल फिर्यादीस सन्मानपुर्वक परत करण्यात आला आहे. सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक, अप्पर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विकास पाटील, पोलीस हवालदार प्रेमदास चव्हाण व सर्व पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी व पोलीस ठाण्याचे मुद्देमाल मोहरील यांनी पार पाडली आहे.

Parbhani Edition
Dec 1, 2024 Page No. 02
Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

# २०.६८ लाखांचा मुद्देमाल तक्रारदारांना परत

**हिंगोली, पुढारी वृत्तसेवा :** जिल्ह्यात मागील एक महिन्यात पोलिस विभागाने तपासामध्ये गुन्हेगारांकडून जप्त केलेला २०. ६८ लाखांचा मुद्देमाल शनिवारी पोलिस ठाण्याच्या वतीने तक्रारदारांना परत करण्यात आला आहे. यामध्ये १४ दुचाकी वाहनांचा समावेश आहे.



जिल्ह्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर गुन्हा उघडकीस आणून आरोपी अटक करणे व मुद्देमाल जप्त करण्याचे काम पोलिस विभागाकडून केले जाते. मात्र अनेक वेळा जप्त केलेला मुद्देमाल तक्रारदारांना मिळविण्यासाठी मोठी कसरत करावी लागते. त्यामुळे पोलिस दलाच्या तपासाबाबत नाराजीचा सूर उमटतो. या प्रकाराला आळा घालण्यासाठी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी दर महिन्याच्या शेवटच्या दिवशी त्या महिन्यात जप्त केलेला मुद्देमाल न्यायालयाच्या परवानगीने तक्रारदारास परत करण्याची मोहिम हाती घेतली आहे. या मोहिमेत दर महिन्याला जिल्ह्यातील १३ पोलिस ठाण्यात घडलेले गुन्हे व उघडकीला आलेले गुन्हे यावर विशेष लक्ष दिले जात आहे. त्यानंतर महिना अखेरीस मुद्देमाल तक्रारदारांना परत केला जात आहे. त्यानुसार शनिवारी जिल्ह्यात पोलिस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील, गुन्हे शाखेचे निरीक्षक विकास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस ठाण्यांमधून मुद्देमाल हस्तांतरण मोहीम राबविण्यात आली. त्यानुसार जिल्ह्यातील चार गुन्ह्यांमधून जप्त केलेले सोन्या चांदीचे दागिने व रोख रक्कम असा २.६८ लाख रुपये तसेच १८ लाख रुपये किमतीची १४ वाहने असा २०.६८ लाख रुपयांचा मुद्देमाल तक्रारदारांना परत करण्यात आला आहे. यामुळे तक्रारदारांमधून समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. मागील दोन महिन्यांत तब्बल ५२ लाख रुपयांचा मुद्देमाल परत करण्यात आला आहे.

Nanded Edition
Dec 01, 2024 Page No. 09
Powered by: erelego.com

# हिंगोलीत २०.६८ लाखांचा मुद्देमाल फिर्यादीला परत !

हिंगोली / प्रतिनिधी

जिल्ह्यात मागील एक महिन्यात पोलिस विभागाने तपासामध्ये गुन्हेगारांकडून जप्त केलेला २०.६८ लाख रुपयांचा मुद्देमाल शनिवारी (दि.३०) सर्व १३ पोलीस ठाण्याच्या वतीने फिर्यादीला परत करण्यात आला आहे. यामध्ये १४ दुचाकी वाहनांचा सुध्दा समावेश आहे.



हिंगोली जिल्ह्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर गुन्हा उघडकीस आणून आरोपी अटक करणे व मुद्देमाल जप्त करण्याचे काम पोलिस विभागाकडून केले जाते. मात्र, अनेकवेळा जप्त केलेला मुद्देमाल फिर्यादीला मिळविण्यासाठी मोठी कसरत करावी लागते. त्यामुळे पोलिस दलाच्या तपासाबाबत नाराजीचा सुर उमटतो. या प्रकाराला आळा घालण्यासाठी पोलिस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी दर महिन्याच्या शेवटच्या दिवशी त्या महिन्यात जप्त केलेला मुद्देमाल न्यायालयाच्या परवानगीने तक्रारदारास परत करण्याची मोहिम हाती घेतली आहे. या मोहिमेत दर महिन्याला जिल्ह्यातील १३ पोलिस ठाण्यात घडलेले गुन्हे व उघडकीला आलेले गुन्हे यावर विशेष लक्ष दिले जात आहे. त्यानंतर महिना अखेरीस मुद्देमाल तक्रारदारांना परत केला जात आहे. त्यानुसार हिंगोली जिल्ह्यात पोलिस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधिक्षक अर्चना पाटील, गुन्हे शाखेचे निरीक्षक विकास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस ठाण्यांमधून मुद्देमाल हस्तांतरण मोहिम राबविण्यात आली. त्यानुसार जिल्ह्यातील चार गुन्ह्यांमधून जप्त केलेले सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा २.६८ लाख रुपये तसेच १८ लाख रुपये किंमतीची १४ वाहने असा २०.६८ लाख रुपयांचा मुद्देमाल फिर्यादीला परत करण्यात आला आहे. यामुळे तक्रारदारांमधून समाधान व्यक्त केल्या जात आहे.

देशोन्नती

# विविध गुन्ह्यातील 20 लाख 68 हजाराचा मुद्देमाल फिर्यादीस केला परत

देशोन्नती वृत्तसंकलन

**हिंगोली:** जिल्ह्यात दाखल झालेल्या अनेक गुन्ह्यातील मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला होता. ३० नोव्हेंबरला २० लाख ६८ हजार रूपयाचा मुद्देमाल फिर्यादीस सन्मानपूर्वक परत करण्यात आला आहे.



जिल्ह्यात अनेक दाखल झालेल्या गुन्ह्यातील मुद्देमाल फिर्यादीस सन्मानपूर्वक परत करण्याची संकल्पना जिल्हा पोलीस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी राबविली आहे. त्या अनुषंगाने ३० नोव्हेंबरला फिर्यादीस परत करण्यात आला. ज्यामध्ये जिल्ह्यातील एकूण चार गुन्ह्यातील सोन्या-चांदीचे दागिने व नगदी असे २ लाख ६८ हजार रूपये, १८ लाख रूपये १४ वाहने असा एकूण २० लाख ६८ हजार रूपयाचा मुद्देमाल फिर्यादीस सन्मानपूर्वक परत देण्यात आला. पोलीस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी पदभार स्विकारल्यापासून अशा प्रकारच्या मोहिमेत आतापर्यंत एकूण जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालात ५२ लाख ५४ हजार ५०० रूपयाचा मुद्देमाल फिर्यादीस सन्मानपूर्वक परत करण्यात आला आहे.

ही कामगिरी जिल्हा पोलीस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलीस अधिक्षक अर्चना पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी रामदास भुसारे, सुरेश दळवे, राजकुमार केंद्रे यांच्यासह स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विकास पाटील, प्रेमदास चव्हाण यांनी यशस्वी पार पाडली आहे.

Hingoli Edition
Dec 01, 2024 Page No. 1
Powered by: erelego.com

लोकमत

# २० लाखांचा मुद्देमाल फिर्यादीस केला परत

लोकमत न्यूज नेटवर्क

**हिंगोली :** जिल्ह्यातील पोलिस ठाण्यात दाखल गुन्ह्यातील आरोपींकडून हस्तगत केलेला २० लाख ६८ हजारांचा मुद्देमाल ३० नोव्हेंबर रोजी फिर्यादींना परत करण्यात आला.

जिल्ह्यातील विविध पोलिस ठाण्यांत गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांकडून तपास करण्यात येतो. यात तपास पूर्ण झाल्यानंतर जप्त मुद्देमाल फिर्यादीस परत करण्याच्या सूचना पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी दिल्या होत्या. त्या अनुषंगाने आरोपींकडून जप्त मुद्देमाल फिर्यादीस परत करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. ३० नोव्हेंबर रोजी ही मोहीम राबविण्यात आली. यावेळी जिल्ह्यातील एकूण चार गुन्ह्यांतील २ लाख ६८ हजार रूपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने, १८ लाखांची १४ वाहने असा एकूण २० लाख ६८ हजारांचा मुद्देमाल फिर्यादीस परत करण्यात आला. पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक विकास पाटील यांच्या पथकाने ही कार्यवाही केली.

## आतापर्यंत ५२ लाखांचा मुद्देमाल परत

पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी पदभार स्वीकारल्यापासून आतापर्यंत ५२ लाख ५४ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल फिर्यादीस परत करण्यात आला. यापुढेही ही मोहीम सुरूच राहणार आहे.

Hello Hingoli
Page No. 3 Dec 01, 2024
Powered by: erelego.com